अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# मनमोहनसिंग सरकारचे शेवटचे १०० दिवस

केंद्रामधील युपीए सरकारचे म्हणजेच मनमोहनसिंग सरकारचे आता साधारणपणे शेवटचे १०० दिवस शिल्लक राहिले आहेत. २०१४ च्या एप्रिल किंवा मे महिन्यामध्ये लोकसभेच्या निवडणुका होतील. त्याची अधिसूचना फेब्रुवारी महिन्यामध्ये जारी होण्याची शक्यता आहे. म्हणजेच या सरकारला काम करण्यासाठी आता जेमतेम १०० दिवस हातात उरले आहेत. दिवस थोडे आणि शिल्लक कामे भरपूर अशी सरकारची परिस्थिती झाली आहे. सगळ्या प्रकारचे प्रयत्न करून महागाई कमी व्हायला तयार नाही. निवडणुकीपूर्वी सामान्य माणसाची मते मिळवायची असतील तर थोड्या-फार प्रमाणात तरी महागाई कमी करणे गरजेचे आहे. परंतु आज महागाईवर सरकारचे अजिबात नियंत्रण नाही. उलट महागाईनेच त्या सरकारला मुठीत पकडलेले दिसते. येत्या महिन्याभरात पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या भावात वाढ होऊ शकते, असे संकेत तेल आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिले आहेत. अजूनही डिझेलवर १४ रुपयांची सबसीडी दिली जाते. ती हळूहळू कमी करण्याच्या उद्देशाने डिझेलच्या दरात वाढ करण्याचा सल्ला दिल्लीत बसलेले बड्या पगाराची नोकरी असलेले नोकरदार देत असतात. सरकारला ते मान्य करावे लागते. डिझेल पेट्रोलच्या किमती वाढणे याचा अर्थ पुन्हा महागाईला निमंत्रण देण्यासारखे असते. पुढच्या महिन्यात जर का डिझेलच्या किंमती वाढल्या तर सरकारला कोणत्याही परिस्थितीत महागाई रोखता येणार नाही. अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी सध्याच्या महागाईला पूर्वीचे अर्थमंत्री आणि सध्याचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी हे जबाबदार आहेत, असे सुचविणारे विधान केले होते. परंतु या सगळ्या आर्थिक गोंधळामध्ये भर घालणारा आणखीन एक प्रकार घडला आहे. तो म्हणजे सरकारच्या कर्जामध्ये चक्क २ लाख कोटींनी वाढ झाली आहे. २०१२ मध्ये ४२ लाख ९२ हजार ८७० कोटी रुपये असलेले कर्ज आता ४५ लाख ८० हजार ४७२ कोटींवर पोहचले आहे. स्वाभाविकपणे या वाढत्या कर्जाचा येणाऱ्या अर्थसंकल्पावर ताण पडेल आणि वित्तीय तूट आणखीनच फुगेल. निवडणुकीच्या तोंडावर अर्थसंकल्पात करवाढ करणे सरकारला राजकीयदृष्ट्या परवडणार नाही. अशा परिस्थितीत ५ वर्षांपूर्वी निवडून आल्यानंतर पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी १०० दिवसांचे उद्दिष्ट ठरवून महागाई कमी करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु आता त्यांच्या सरकारचे शेवटचे १०० दिवस उरले तरी महागाईच्या परिस्थितीत एका टक्क्याचाही फरक पडलेला नाही.

## गैरकारभाराचा विक्रम

स्वत:च्या सरकारचे १०० दिवस तर पूर्ण होतील. परंतु सामान्य माणसाला ज्या १०० टक्के महागाईने भरडून काढलेले आहे. त्यातून दिलासा मिळण्याची कोणतीच शक्यता वाटत नाही. त्यामुळे मनमोहनसिंग सरकारचे सुरुवातीचे १०० आणि शेवटचे १०० दिवस लोकांच्या चांगल्या स्मरणात राहतील. गेली ५ वर्षे तर केवळ महागाईच नव्हे तर सगळ्याच क्षेत्रामध्ये गैरकारभाराचे या सरकारने विक्रम निर्माण केले आहेत. कोळसा खाणीतल्या भ्रष्टाचारापासून ते संरक्षण खात्याच्या वादग्रस्त खरेदीपर्यंत अनेक गोष्टी या सरकारने केल्या. त्यांच्या सरकारमधल्या तीन मंत्र्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून राजीनामे द्यावे लागले. दूरसंचार खात्याच्या भ्रष्टाचाराने तर तब्बल दोन मंत्र्यांची सीबीआय चौकशी करणे भाग पाडले. रेल्वे मंत्र्यांनी आपल्या भाच्याला हाताशी धरून पैसे खाण्याचे उद्योग केले. मोठ्या पदावरच्या नियुक्त्या करण्याकरिता कोट्यवधी रुपयांची लाच दिली गेली आणि रेल्वेतल्या कर्मचाऱ्यांच्या भरतीतही प्रचंड गैरप्रकार केले गेले. प्रत्यक्ष पंतप्रधान कार्यालयाच्या कारभाराबाबतही शंका घेतली गेली. गेल्या ५ वर्षांत मनमोहनसिंग सरकारने जे जे चुकीचे निर्णय घेतले त्यामुळे देशातील लाखो-कोटींचे नुकसान झाले. स्वत:ची स्वच्छ प्रतिमा जपण्याच्या प्रयत्नात सरकारची प्रतिमा मात्र कायम मलिन होत राहिली. भ्रष्टाचार आणि गैरकारभार या दोन्ही बेजबाबदार प्रकारांमुळे सामान्य माणसाला कोणत्याही सवलती मिळालेल्या नाहीत. आज देशातल्या गरिबाला अन्न सुरक्षा देण्याचा एकमेव चांगला प्रयत्न या सरकारने केला. परंतु, त्यासोबत रोज लागणाऱ्या रॉकेल आणि गॅस सिलेंडरच्या किंमती भरमसाठ वाढणे. त्या सगळ्या महागाईला सरकारची राजकीय सबसिडी कारणीभूत असल्याचे अर्थतज्ज्ञ सांगतात. परंतु हे अर्धसत्य आहे. कारण आज १ लाख कोटींची कर्जे आपण सरकारचे जावई आहोत अशा थाटात बड्या भांडवलदारांनी बुडवली आहेत. त्यांच्या तिजोऱ्या भरत राहिल्या आणि सामान्य माणसाचा खिसा रिकामा होत राहिला.

## महाराष्ट्रातही दरवाढीचे दणके

महाराष्ट्राचे ताजे उदाहरण घेतले तर सामान्य माणूस वापरत असलेल्या आरे दुधाच्या किंमतीत दोन रुपयांनी वाढ झाली आहे. मुंबईत पार्किंग करण्यासाठी असलेल्या शुल्कामध्ये वाढ करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्याच वेळी महाराष्ट्रात एमआयडीसीतर्फे जे पाणी पुरविले जाते, त्यात १ डिसेंबरपासून अडीचपट वाढ होणार आहे. डिसेंबर महिन्यातच उपनगरीय रेल्वेच्या भाड्यातही वाढ होण्याची शक्यता आहे. ही सगळी छोटी-छोटी उदाहरणे असली तरी महागाईच्या आगीमध्ये तेल ओतणारीच म्हणावी लागतील. अशा एकापाठोपाठ दरवाढीच्या कुऱ्हाडी सामान्य माणसाच्या डोक्यावर आदळत आहेत. दुर्देवाने काँग्रेस तर सोडा परंतु एकाही राजकीय पक्षाला याबद्दल खेद किंवा खंत वाटत नाही. उलट सगळे राजकीय पक्ष निवडणुकीसाठी भरमसाठ पैसा गोळा करीत आहेत. मेळावे भरवण्याकरिता पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहेत. मनमोहनसिंग सरकारच्या कारकिर्दीची शंभरी भरत असताना सामान्य माणसाच्या सहनशीलतेची शंभरी भरली आहे आणि तो आपला असंतोष निवडणुकीच्या माध्यमातून व्यक्त केल्याशिवाय राहणार नाही. तसे पाहिले तर युपीए सरकारने शेवटच्या १०० दिवसांचा योग्य तो उपयोग करून घ्यायला हवा. झालेल्या चुका दुरुस्त करण्याची ही शेवटची संधी आहे. तिचा त्यांनी उपयोग करावा.